मालमत्ता/पहारेकरी पाळी बदली/ ४४३/२०१७
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला,
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

दिनांक: 14 FEB 2017

**परिपत्रक क्रमांक ४९५ दिनांक १४ / ०२ /२०१७**

असे निदर्शनास आले आहे की, बहुतांशी पहारेकरी कार्यालयाची पूर्व परवानगी न घेता आपआपसात कामाची वेळ बदलून घेतात.

सर्व पहारेकरी यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, त्यांना त्यांचे कामाची वेळेत काही अपरिहार्य कारणास्तव आपआपसात बदलावयाची असल्यास सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय यांची पुर्व परवानगी घ्यावी, व काही आकस्मिक कारणासाठी वेळ बदलणे भाग पडल्यास तात्काळ दुसऱ्या दिवशी सहायक धर्मादाय आयुक्त, मुख्यालय यांचे निदर्शनास सदर बाब आणुन त्यास कार्योत्तर लेखी मान्यता घ्यावी. तसेच स्वत:ची पाळी संपल्यानंतर पहारेकरांनी कोणाकडुन चाव्या घेतल्या व कोणाला दिल्या ते सहायक धर्मादाय आयुक्त, याचेकडील नोंदवहीत नमुद करावे.

पहारेकरी हा पद अत्यावशक सेवेत मोडत असुन या परिपत्रकाद्वारे सक्त ताकिद देण्यात येते की, जर भविष्यात पहारेकऱ्यांनी आपआपसात कामाची वेळ बदलुन घेतल्याचे निदर्शनास आल्यास व त्या कालावधीत काही अनुचित घटना घडल्यास त्या घटनेस संबधित पहारेकरी जवाबदार असल्याचे आढळून आले तर नियमित पाळी असलेल्या पहारेकऱ्यास जवाबदार धरण्यात येईल व संबधितावर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची सर्व पहारेकऱ्यांनी नोंद घ्यावी.

१४/२/१७

सहायक धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति:
सर्व पहारेकरी
१. श्री आनंद भ. पंडागळे
२. श्री विरेंद्र पि. पाटील
३. श्री किशोर शि. आघाम
४. श्री संतोष श. हनवते

प्रत:
१. अधिक्षक (आस्थापना)
२. जनसंपर्क अधिकारी